MHKO070017992019

<u>न्यायनिर्णय</u>

(घोषित दिनांक- २९/०२/२०२०)

प्रस्तुत प्रकरणातील पुरावा, कागदपत्रांचे अवलोकन केले असता खालील मुद्दे माझे विचारार्थ निघतात. त्यावरील माझी कारणांसहित उत्तरे मी यापुढे नमूद करीत आहे.

| अ.क्र. | मुद्दे | निष्कर्ष |
| --- | --- | --- |
| १. | दिनांक २२/०८/२०१९ इ. रोजी १८.३० वाजताचे सुमारास शिरोळ तालुक्यातील नांदणी नाका येथे जालींदर वडर यांच्या रहाते घराच्या भिंतीच्या पाठीमागे आडोशास उघडयावर आरोपी हा विना परवाना बेकायदा देशी दारु संत्रा रेठरा कंपनीच्या प्रत्येकी १८० मिलीच्या एकुण १६ बाटल्या प्रत्येकी किंमत ५२/- असा एकूण रक्कम रु.८३२/- किंमतीचा प्रमाणे बाळगलेला असताना मिळून आला आणि म्हणून त्याने मुंबई दारुबंदी अधिनियम कलम ६५(ई) खालील गुन्हा केला असे अभियोग पक्ष सिध्द करतो का ? | नाही. |
| २. | आदेश काय ? | अंतिम आदेशाप्रमाणे. |

## कारणमीमांसा

मुद्दा क्रं.१ व २ करिता-

०२. पंच साक्षीदार बापू शामराव चव्हाण (अ.सा.क्र.१) यांचे सरतपासामध्ये असे आले आहे की, दि.२२/०८/२०१९ रोजी शिरोळ पोलीसांनी त्यांना नांदणी गावातील वडर यांच्या घराच्या पाठीमागे पंचनामा करणेसाठी बोलावले होते. तेथे पोलीसांनी आरोपीच्या ताबेतून १६ बाटल्या रेटरा कंपनीच्या जप्त केल्या. पोलीसांनी त्यांचेसमक्ष सदर बाटल्यामधून वेगळया बाटलीत सॅंपल घेवून सदरची बाटली त्यांच्या सहीने सिलबंद केली. त्यानंतर पोलीसांनी त्यांचेसमक्ष आरोपीकडून सदरचा मुद्देमाल जप्तीचा तसेच घटनास्थळाचा पंचनामा (नि.नं.७) केला. त्यांनी आरोपीस न्यायालयात ओळखले आहे. आरोपीच्या वकीलांनी घेतलेल्या उलटतपासात सदर साक्षीदाराने आरोपीस फायदा होईल असे कोणत्याही प्रकारचे कथन केले नाही. परंतू उलटतपासमध्ये त्यांनी यापुर्वी ब-याच खटल्यामध्ये पंच म्हणून काम केल्याचे कबुल केले. अभियोग पक्षातर्फे अन्य कोणताही साक्षीदार तपासलेला नाही. आरोपीचे फौजदारी प्रक्रिया संहिता कलम ३१३ अन्वये नोंदविण्यात आलेले आहे. आरोपीने अभियोग पक्षाने त्यांच्याविरुध्द खोटी केस दाखल केल्याचे कथन केले असुन त्याच्या वतीने पुरावा दिलेला नाही.

०३. अभियोग पक्षाने आरोपीवरील अपराधसिध्दीसाठी पंच साक्षीदार बापू शामराव चव्हाण (अ.सा.क्र.१) या एकमेव साक्षीदाराचा पुरावा नोंदविला आहे. बापू शामराव चव्हाण (अ.सा.क्र.१) यांनी त्यांच्या पुराव्यात मुद्देमाल जप्तीचा व घटनास्थळाचा पंचनामा (नि.क्र.७) त्यांचे समक्ष झाल्याचे कथन केले आहे. वास्तविक अभियोग पक्षाने आरोपीविरुध्दचा गुन्हा शाबीत करणेकामी केवळ जप्तीचा पंच तपासलेला आहे. अभियोग पक्षातर्फे प्रस्तुत गुन्हयातील तपासी अधिकारीआणि फिर्यादी यांना तपासण्यात आलेले नाही. त्यामुळे प्रस्तुत गुन्हयातील फिर्याद सिध्द झालेली नाही. तसेच प्रस्तुत खटल्यात जप्त करण्यात आलेले द्रव्य दारु होती असे सिध्द झालेले नाही, कारण जप्त करण्यात आलेला मुद्देमाल रासायनिक पृथ्थकरणासाठी पाठविल्याबाबतचा पुरावा अथवा

रासायनिक पृथ्थकरणाचा अहवाल प्रस्तुत खटल्यात दाखल केलेला नाही. अशा परिस्थितीत आरोपीविरुध्द विषयांकित गुन्हा अभियोग पक्षाने रास्त शंकेपलीकडे जाऊन सिध्द केलेला नाही. सबब, मुद्दा क्र.१ चे उत्तर मी नकारार्थी देत आहे आणि मुद्दा क्र.२ चे उत्तरार्थ पुढील आदेश पारित करीत आहे.

<u>आदेश</u>

| | |
|---|---|
| १. | आरोपी आनंदा श्रीकांत बागडी, रा. बालाजी पार्क संभाजीपूर, ता.शिरोळ, जि.कोल्हापूर यांस मुंबई दारुबंदी अधिनियम कलम ६५(ई) खालील शिक्षापात्र गुन्हा केल्याचे आरोपातून फौजदारी प्रक्रिया संहिता कलम २५५(१) नुसार दोषमुक्त करण्यात येत आहे. |
| २. | आरोपींचे जामीनपत्र व बंधपत्र रद्द करण्यात येते. |
| ३. | अपिल कालावधी संपल्यानंतर गुन्हयातील जप्त मुद्देमाल देशी दारु संत्रा रेठरा कंपनीच्या प्रत्येकी १८० मिलीच्या एकुण १६ बाटल्या प्रत्येकी किंमत ५२/- असा एकूण रक्कम रु.८३२/- किंमतीचा मुद्देमाल उत्पादन शुल्क विभाग, कोल्हापूर यांचेकडे पाठविण्यात यावा. |

DISTRICT COURTS MAHARASHTRA

सत्यमेव जयते

Digitally signed by Vishwas Pandurang Shinde
Date: 2020.03.05 03:28:35 +0530

( विश्वास पां.शिंदे )

दिनांकः२९/०२/२०२०. न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग, जयसिंगपूर